**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क.नाविमं/प.उ.मा./2686
नागपूर, दि. 26/08/2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.
(भंडारा,चंद्रपुर,नागपुर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया.)

विषय :— योग्यता प्रमाणपत्र समकक्षता एक सुत्रीपणाच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ :—1) राज्य मंडळ कार्यालयात आयोजित दिनांक 19 जुलै, 2024 रोजीची परीक्षा समिती सभा.
2) राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा. मं./गणकयंत्र/101/3096, दिनांक 02/08/2024 रोजीचे पत्र.
3) राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं. पुणे/संशोधन/समकक्षता/3337,दिनांक 23/08/2024 रोजीचे पत्र.
4) परीपत्रक्र.रा.मं./पुणे/संशोधन/योग्यता प्रमाणपत्र/2024—25/3338, दिनांक 23/08/2024 चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारतातील व भारताबाहेरील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यकक्षेत असलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी योग्यता प्रमाणपत्राच्या अर्ज व त्याबाबतची कार्यपध्दती ही सर्व विभागीय मंडळामध्ये एकसमान असणे आवश्यक असल्याने सदर विषय दिनांक 19/07/2024 रोजीच्या परीक्षा समितीमध्ये ठराव पारित करण्यात आला.

योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाच्या वेबसाईडवर विविध शुल्क आकारून उपलब्ध करून दिल्याने कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मंडळात योग्यता प्रमाणपत्र अर्ज घेण्यात यावे लागणार नाही. त्यामुळे येण्या—जाण्याचा वेळ व खर्च वाचणार असून विभागीय मंडळाकडून कळविण्यात आले होते.

करीता सदरची कार्यपध्दती बंद करण्यात येत असून, ऑनलाईन अर्ज भरण्याचा **दिनांक 26/08/2024** सुरू होत असून,**फेब्रु./मार्च 2025** च्या परीक्षेपासून (नव्याने नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे) योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज व त्यासोबत आवश्यक असणारे कागदपत्रे ऑनलाईन स्वरूपात स्विकारले जाणार आहेत. सदर अर्जाचा नमुना मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेला आहे. योग्यता प्रमाणपत्रासाठी खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | विद्यार्थी तपशिल | नियमित शुल्क तपशिल |
|---|---|---|
| 01. | भारतातील विद्यार्थ्यांसाठी | रू. 1000/— |
| 02. | भारताबाहेरील/परराज्यातील विद्यार्थ्यांसाठी | रू. 1500/— |

तसेच विलंब शुल्क व अतिविलंब शुल्क व इतर दंडात्मक शुल्काबाबत प्रचलीत पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल. योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाही. याबाबत आपल्या संबंधित कार्यकक्षेतील विद्यार्थ्यांना सुचित करण्यात यावे. याची सर्व कनिष्ठ महाविद्यालयाने नोंद घ्यावी.

सोबत :— राज्य मंडळाच्या परीपत्रकाची प्रत.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी :—
1) सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.

स्वरूपात स्विकारले जाणार आहेत. सदर अर्जाचा नमुना मंडळाच्या www.mahahsscboard.inया संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेला आहे. योग्यता प्रमाणपत्रांसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात यावे.

| अ. क्र. | विद्यार्थी तपशील | नियमित शुल्क तपशील |
|---|---|---|
| १ | भारतातील विद्यार्थ्यांसाठी | रु. १०००/- |
| २ | भारताबाहेरील/परराज्यातील विद्यार्थ्यांसाठी | रु. १५००/- |

विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क व इतर दंडात्मक शुल्कासंदर्भात प्रचलित पद्धतीने कार्यवाही करावी."

१) संबंधित कर्मचाऱ्यांनी online पद्धतीने प्राप्त अर्ज तसेच कागदपत्रांची पडताळणी करून स्वत:च्या अभिप्रायासह पात्र/अपात्र/अपूर्ण (Eligible/ Not-eligible/Incomplete)असा शेरा ऑनलाईन पद्धतीने देऊन पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचे आहेत. वरील प्रमाणे कार्यवाही केल्यावर संबंधित कर्मचाऱ्याच्या Login मध्ये कार्यवाही पूर्ण केलेल्या अर्जाची एकत्रित यादी (pdfस्वरूपात) काढण्याची सुविधा दिलेली आहे. शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांनी त्यांच्या Login मधून प्राप्त यादीतील (pdf) सर्व योग्यता प्रमाणपत्र अर्जाची व कागदपत्रांची पडताळणी करून सदर यादीवर आपले अभिप्राय नोंदवावे व पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावे, त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या सर्व अर्जाबाबत अंतिम निर्णय पात्र/अपात्र (Eligible/ Not-eligible) असा शेरा ऑनलाईन पद्धतीने द्यावयाचा आहे.विभागीय मंडळ स्तरावर योग्यता प्रमाणपत्रासाठीचे अर्ज Maker/Checker पद्धतीने तपासावयाचे आहेत.

प्राप्त झालेले अर्ज Assign केलेल्या जिल्हा/ तालुका नुसार संबंधित कर्मचाऱ्याला (Desk) त्यांचे Login मध्ये उपलब्ध होतील. त्यांनी onlineपद्धतीने कागदपत्रांची पडताळणी करून स्वत:च्या अभिप्रायासह पात्र/अपात्र (Eligible/ Not-eligible) अर्ज पात्र/अपात्र यादीसह Final Authority (Checker) कडे अंतिम पडताळणी करिता forward करावयाचा आहे. अथवा कागदपत्रे अपूर्ण असल्यास Incomplete remark करून कनिष्ठ महाविद्यालयाकडे परत पाठवावयाचा आहे. Final Authority असणाऱ्या वापरकर्त्याने सदर अर्ज पात्र/अपात्र (Eligible/ Not-eligible) असा अंतिम Remark द्यावयाचा आहे.अर्ज पात्र केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे Eligibility Certificate तयार होऊन संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात त्यांच्या Login मध्ये उपलब्ध होईल.

२) आपल्या विभागीय मंडळामध्ये योग्यता प्रमाणपत्रासंदर्भात स्वतंत्र शाखा असल्यास त्या संबंधित शाखेस स्वतंत्रपणे संगणक व नेट यंत्रणा उपलब्ध करून देण्यात यावी.

३) सदर प्रक्रिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील विभागीय मंडळ स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व योग्यता प्रमाणपत्र शाखा यांचेकडून समन्वयाने करून घेण्यात यावे.

४) इ.११ वी व इ.१२ वी फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेसाठी योग्यता प्रमाणपत्र शुल्क ऑनलाईन पद्धतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन पद्धतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यामक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणीशेजारी,आघारकर इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./संशोधन/समकक्षता/3337
पुणे - ४११००४
दिनांक - २३/०८/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय -योग्यता प्रमाणपत्र/ समकक्षता एकसुत्रीपणाच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ -१) राज्यमंडळ कार्यालयात आयोजित दि. 19 जुलै, 2024 रोजीची परीक्षा समिती सभा
२)राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं./गणकयंत्र /101/3096 दि. 2/08/2024 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारतातील व भारताबाहेरील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यकक्षेत असलेल्या उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठमहाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज व त्याबाबतची कार्यपद्धती ही सर्व विभागीय मंडळामध्ये एकसमान असणे आवश्यक असल्याने सदर विषय दि.19/07/2024 रोजीच्या परीक्षा समिती सभेत निर्णयार्थ सादर करण्यात आला असता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

" पुणे विभागीय मंडळ कार्यालयात कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांचे सोबत दि. ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती सदर सभेमध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाच्या वेबसाईटवर विहित शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात यावे अशी मागणी केली आहे.

योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाच्या वेबसाईटवर विहित शुल्क आकारून उपलब्ध करून दिल्याने कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रतिनिधीस मंडळात योग्यता प्रमाणपत्र अर्ज घेण्यास यावे लागणार नाही. त्यामुळे येण्याजाण्याचा वेळ व खर्च वाचणार असून विभागीय मंडळास वारंवार योग्यता प्रमाणपत्र अर्जाची छपाई करावी लागणार नाही, असे पुणे विभागीय मंडळाकडून कळविण्यात आले होते. याबाबत सभेमध्ये सर्वकष चर्चा करण्यात आली. चर्चेअंती भारतातील व भारताबाहेरील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या कार्यकक्षेत असलेल्या उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज व त्याबाबतची कार्यपद्धती ही सर्व विभागीय मंडळामध्ये एकसमान असणे आवश्यक आहे असे ठरले आहे.

प्रचलित पद्धतीने योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑफलाईन स्वरूपात विभागीय मंडळाकडे सादर करण्यास येत होते. सदरची कार्यपद्धती बंद करण्यात येत असून, फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या परीक्षेपासून (नव्याने नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे ) योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज व त्यासोबतचे आवश्यक असणारे कागदपत्र ऑनलाईन

उमाप
24/8

* राज्याबाहेरील किंवा परदेशातील / इतर मंडळातून उत्तीर्ण होऊन आलेले जे विद्यार्थी इ. १२ वी मध्ये प्रवेश घेण्यास पात्र आहेत त्यांनी १ सप्टेंबर पूर्वीच इ. ११ वी उत्तीर्णतेचे मूळ स्थलांतर (Mirgration) प्रमाणपत्र व इतर आवश्यक त्या कागदपत्रांसह योग्यता प्रमाणपत्रासाठीअर्ज सादर करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ शैक्षणिक संस्थेकडून स्थलांतर (Mirgration) प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध नाही,त्यांनी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विभागीय शिक्षण उपसंचालक यांची प्रतिस्वाक्षरी असलेल्या दाखल्याची साक्षांकित छायाप्रत सादर केल्यास ग्राह्य धरली जाईल. सदर (Mirgration Certificate)Digilocker वर उपलब्ध असल्यास ते ग्राह्य धरावे. इतरमंडळातून खाजगीरित्या प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे मूळस्थलांतर प्रमाणपत्र (Mirgration) आवश्यक आहे. कारण फेब्रु-मार्च परीक्षेसाठी मंडळाने निश्चित केलेल्या मुदतीत आवेदनपत्र ऑनलाईन भरण्यात यावे.मात्र एखाद्या विद्यार्थ्यांचे पालक निर्धारित मुदतीनंतर राज्यामध्ये बदलून आल्यास अश्या विद्यार्थ्यांचा प्रस्ताव विलंब शुल्क व दंडाच्या रकमेसह सर्व कागदपत्रांची पूर्तता असेल तरच स्विकारण्यात येईल.

**इ) योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर करतांना कनिष्ठ महाविद्यालयानी खालील सुचनांचे काटेकोरपणे पालनकरणे बंधनकारक आहे.**

१. विभागीय शिक्षण उपसंचालकांनी इ. ११ वीसाठी ऑनलाईन प्रवेश दिल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थी-

अ) अधिकृत बोर्डाची इ. १० वी परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे काय ?

ब) इंग्रजी विषयासह पाच विषयात उत्तीर्ण आहे काय?

क) इ. ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला असल्यास विज्ञान विषयात संबंधित मंडळाच्या निकषानुसार विद्यार्थी विज्ञान विषयात उत्तीर्ण आहे काय?

ड) विज्ञान असा ठळक विषय नसला तरी त्याने घेतलेल्या विषयात विज्ञान शाखेच्या/विषयाच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचा अभ्यासक्रम असलेला विषय असावा. या चारही बाबींचा संबंधित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रावरून पडताळणी करूनच प्रवेश देण्यात यावा अन्यथा प्रवेश देण्यात येऊ नये.

२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या विभागीय मंडळासाठी ए.टी.के.टी. चा नियम लागू आहे. परंतु इतर बोर्डातील विद्यार्थ्यांना ए.टी.के.टी. चा नियम लागू नाही, याची नोंद घ्यावी.

३. काही बोर्डाच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्र एकच असतात त्याप्रमाणे त्यावर नमूद केलेले असते. ज्या बोर्डाची गुणपत्रिका स्वतंत्र देण्यात येते त्या बोर्डाचे प्रमाणपत्र अथवा तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Passing Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

४ Digilocker द्वारे प्राप्त प्रमाणपत्रे हि आय टि ॲक्ट २०००नुसार legally valid असल्यामुळे Digilocker वर उपलब्ध असल्यास document ग्राह्य धरण्यास हरकत नाही.सदर Document चा QR Code हा Digilocker app मधील Scanner द्वारे Scan करून त्याची वैधता पडताळणी करावी.

५ वरील अटी व शर्तीची पूर्तता केलेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश द्यावा.

६ योग्यता प्रमाणपत्राशी संबंधित माहिती अथवा इतर बाबींसाठी कनिष्ठ महाविद्यालयाचा जबाबदार प्रतिनिधी मंडळात पाठविण्यात यावा. विद्यार्थी/पालक यांना मंडळामध्ये पाठविण्यात येऊ नये.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे- ०४

**परिपत्रक** क. रा.मं./संशोधन/यो.प्र./२०२४ –२५/3338, दि. 23/०८/२०२४

------------------- विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, मंडळ अधिनियम १९६५ नुसार व विनियम १९७७ नियम क्र. ८० (१) अन्वये या मंडळाव्यतिरिक्त इतर संविधानिक मंडळे , मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठे यांच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इ. ११ वी/ १२ वी प्रवेशासाठी योग्यता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याबाबतच्या सूचना व कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहेत.

**अ) योग्यता प्रमाणपत्रासाठी पात्रतेच्या अटी -**

१. राज्यमंडळाने निर्देशित केलेल्या बोर्डाशी समकक्ष असलेल्या बोर्डामधून विद्यार्थी इ.१० वी उत्तीर्ण असावा. समकक्ष बोर्डाची यादी मंडळाच्या mahahsscboard.in.या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२. विद्यार्थी इ. १० वी/ इ. ११ वी परीक्षा इंग्रजी विषयासह पाच विषयामध्ये उत्तीर्ण असावा.

३. इ. ११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला असल्यास विज्ञान विषयात संबंधित मंडळाच्या निकषानुसार विद्यार्थी विज्ञान विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**ब ) योग्यता प्रमाणपत्र अर्ज उपलब्ध करून देणेबाबतची कार्यवाही-**

परराज्यातील / परदेशातील विद्यार्थी ज्यावेळी इ. ११ वी मध्ये मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतात, त्यावेळी भारतीय विद्यार्थ्यांसाठी रु. १०००/- व परदेशातील (भारताबाहेरील ) विद्यार्थ्यांसाठी रु.१५००/- हे विहित शुल्क आकारून कनिष्ठ महाविद्यालया मार्फत विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑनलाईन स्विकारावेत.

**क ) योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने अपलोड करणे आवश्यक आहे.-**

१. उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका, प्रमाणपत्र, शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत स्वसाक्षांकित (Self-Attested ) केलेली असावी.

२. मूळ प्रमाणपत्र संबंधित मंडळाकडून प्राप्त झालेले नसल्यास मुळ तात्पुरते प्रमाणपत्र. (Provisional Certificate) व त्याची प्रमाणित छायांकित प्रत.

३. मूळ स्थलांतर प्रमाणपत्र ( Original Migration Certificate )

४. अर्जासोबत जोडलेले विहित नमुन्यातील हमीपत्र ( Deed of undertaking) हे विद्यार्थ्यांकडून भरून घेण्यात यावे.

५. परदेशी विद्यार्थ्यांनी वरील अ. क्र. १ ते ४ या कागदपत्रासह अर्जासोबत आलेले "Appedix A" वर सबंधीत शाळेचा सही शिक्का तसेच भारतीय राजदूतावास(Indian Embassy) यांची सहीशिक्का असणे आवश्यक आहे.

**ड) योग्यता प्रमाणपत्र अर्ज ऑनलाईन सादर करण्याबाबतच्या तारखा व शुल्क तक्ता जोडला आहे.**

* १२ वी तील त्रुटी पूर्तता निकालानंतर दि 31 ऑगस्ट अंतिम मुदत देण्यात येत आहे. योग्यता प्रमाणपत्राची त्रुटी पूर्तता न झाल्यास सदर विद्यार्थ्यांची परीक्षेची संपादणूक रद्द करण्यात येईल.

१५ शैक्षणिक खंड (गॅप) असेल तर अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशास शैक्षणिक खंडाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) देणे आवश्यक आहे.

१६ कोणताही पात्र विद्यार्थी योग्यता प्रमाणपत्र अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी. जर विद्यार्थ्याचा योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झाला नाही अथवा पाठविण्यात आला नाही अशी बाब या मंडळाच्या निदर्शनास आल्यास संबंधीत कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता काढून घेण्याची कारवाई केली जाईल. योग्यता प्रमाणपत्रा अभावी विद्यार्थ्याच्या होणाऱ्या नुकसानीस मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

१७ विभागीय मंडळ स्तरावर योग्यता प्रमाणपत्रासाठीचे अर्ज Maker/Checker पद्धतीने तपासावयाचे आहेत. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले अर्ज नेमून दिलेल्या जिल्हा /तालुका नुसार संबंधित कर्मचाऱ्याला (Deskuser) त्यांचे Login मध्ये उपलब्ध होतील.

१८ संबंधित कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने प्राप्त अर्जाची online पद्धतीने कागदपत्रांची पडताळणी करून स्वतःच्या अभिप्रायासह पात्र/अपात्र (Eligible/Not-eligible) मार्क करुन Final Authority (Checker) कडे अंतिम पडताळणी करिता पात्र/अपात्र यादीसह forward करावयाचा आहे. अथवा कागदपत्रे अपूर्ण असल्यास Incomplete remark करून कनिष्ठ महाविद्यालयाकडे परत पाठवावयाचा आहे. Final Authority असणाऱ्या वापरकर्त्याने सदर अर्ज पात्र/अपात्र (Eligible/ Not-eligible) असा अंतिम Remark दयावा. अर्ज पात्र केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे Eligibility Certificate तयार होऊन संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात त्यांच्या Login मध्ये उपलब्ध होईल.

१९ कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई- मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी योग्यता प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.

२० आपल्या विभागीय मंडळामध्ये योग्यता प्रमाणपत्रासंदर्भात स्वतंत्र शाखा असल्यास त्या संबंधित शाखेस स्वतंत्रपणे संगणक व नेट यंत्रणा उपलब्ध करून देण्यात यावी.

२१ सदर प्रक्रिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील विभागीय मंडळ स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व योग्यता प्रमाणपत्र शाखा यांचेकडून समन्वयाने करून घेण्यात यावे.

२२ इ. १२ वी फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेसाठी योग्यता प्रमाणपत्र शुल्क ऑनलाईन पद्धतीने (Debit Card/ Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पद्धतीने शुल्क जमा केल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयांना पोचपावती प्राप्त होईल. यापूर्वी कनिष्ठ महाविद्यालयाने ऑफलाईन योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज व इतर कागदपत्रांच्या हार्ड कॉपीज (Hard Copies)विभागीय मंडळाकडे जमा करण्यात येत होत्या तथापि फेब्रु- मार्च २०२५ च्या परीक्षेपासून सदर कार्यपद्धतीत बदल करण्यात आला असून, कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज व इतर कागदपत्रे प्रत्यक्षात जमा न करता ती कागदपत्रे ऑनलाईन(Online)

७ ज्या विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज मंडळास सादर करून योग्यता प्रमाणपत्र घेतलेले नाही अश्या विद्यार्थ्यांना इ. ११ वीचा निकाल कनिष्ठ महाविद्यालयाने राखून ठेवावा. योग्यता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थ्यास इ. १२ वी मध्ये प्रवेश देण्यात येवू नये.

८ ज्या मंडळाच्या नियमित विद्यार्थ्यांना स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) दिले जात नाही, अश्या विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर संबंधित जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी असलेल्या दाखल्याची छायांकित प्रत साक्षांकित केलेली ग्राह्य धरली जाईल. इतर मंडळामधून खाजगीरित्या प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र आवश्यक आहे.

९ राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून (NIOS) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही वर्गाची शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित केलेली प्रत सादर करावी अथवा संपर्क केंद्राने दिलेला दाखला (LC) जोडलेला असावा.

१० योग्यता प्रमाणपत्र अर्जाचे ऑनलाईन पद्धतीने मंडळाकडे शुल्क भरावे. अर्ज विभागीय मंडळाकडे सादर करण्यापूर्वी सदर अर्जातील माहिती तसेच अपलोड केलेले कागदपत्रे हे योग्य असल्याची खात्री कनिष्ठ महाविद्यालयांनी करावयाची आहे. तसेच परिपूर्ण प्रस्ताव असणा–या विद्यार्थ्यांचेच अर्ज विभागीय मंडळाकडे पाठविण्यात यावे.

११ परदेशातील विद्यार्थ्यांकरिता "Appedix'A' "वर संबंधित शाळेचा सही व शिक्का तसेच भारतीय राजदूतावास (Indian Embassy ) यांची सही शिक्का असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थी ज्या मंडळातून इ. १० व इ. ११ वी उत्तीर्ण झाले आहेत त्या मंडळाची विषययोजना पडताळणी तसेच संबंधित परीक्षा मंडळाचे उत्तीर्णतेचे निकष, राज्य शासनाच्या कोणत्या नियमाद्वारे नोंदणी प्राप्त आहे याचा दाखला या सर्व बाबींची पडताळणी करणे आवश्यक असते. त्यामुळे समकक्षता यादीमध्ये समावेश नसलेल्या संस्थेमधील/ मंडळातील परदेशातील/ परराज्यातील विद्यार्थ्यांना योग्यता प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव सदर विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र अर्जप्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या योग्यता प्रमाणपत्रासाठीच्या अर्जाची प्रिंट आऊट काढुन प्रचलित पद्धतीने पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करावा.

१२ अन्य मंडळाकडून आलेल्या विद्यार्थ्यांना इ. १२ वी परीक्षेचे आवेदनपत्र भरण्यापूर्वी योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे कनिष्ठ महाविद्यालयास बंधनकारक आहे, अन्यथा१२ वी परीक्षेचे आवेदनपत्र भरता येणार नाही. परंतु योग्यता प्रमाणपत्र अर्ज मंडळात सादर न करता परस्पर विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट केले जातात. सदर बाब मंडळाच्या निदर्शनास आल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळ मान्यता काढून घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल व विद्यार्थ्यांची संपादणूक रद्द करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१३ इ. ११ वी अन्य मंडळात उत्तीर्ण करून इ.१२ वी मध्ये मंडळात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडे स्थलांतर (Migration) प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाने विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून मंडळ बदलीबाबतचे परवानगी पत्र योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तद्नंतर आलेले प्रस्ताव दंडनीय दराने पात्र असतील.

१४ टी.सी. गुणपत्रक, संबंधित मंडळांकडून प्राप्त ग्रेडचे गुणात रूपांतर केलेली प्रत व प्रमाणपत्र (संबंधित मंडळांकडून मूळ प्रमाणपत्र प्राप्त नसल्यास मूळ तात्पुरते प्रमाणपत्र म्हणजेच (Provisional Certificate) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत (सदर प्रत संबंधित कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक /प्राचार्य यांनीच प्रमाणित केलेली असावी.)

पद्धतीने विभागीय मंडळाकडे सादर करावयाची आहेत.

२३ योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२४ तसेच योग्यता प्रमाणपत्राची Llink व अतिरिक्त शुल्काचा तक्ता मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व कनिष्ठ महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून दयावी.

उपरोक्त परिपत्रक कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी व पालकांच्या निदर्शनास आणावे.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, -४.

प्रत माहितीस्तव-

१) परीक्षा शाखा राज्यमंडळ पुणे,

२) गणकयंत्र विभाग राज्यमंडळ पुणे,

परिशिष्ट 'ब'

## योग्यता प्रमाणपत्र शुल्काचा तक्ता

| अ. क्र. | विवरण | प्रचलित शुल्क | सुधारित ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे शुल्क |
|---|---|---|---|
| १ | **भारतीय विद्यार्थी**<br>नियमित शुल्कासह योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारणे. (दि.१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पर्यंत ) | रु.२०० + ५००= ७००/- | रु. १०००/- |
| २ | **परदेशी विद्यार्थी**<br>नियमित शुल्कासह योग्यता प्रमाणपत्र अर्ज स्विकारणे. (दि.१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पर्यंत ) | रु.७००+७००= १४००/- | रु. १५००/- |
| ३ | **भारतीय विद्यार्थी**<br>योग्यता प्रमाणपत्राचे विलंब शुल्क भारतीय विद्यार्थी (दि. १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर) | रु.५००+१०० = ६००/- | रु.१०००+१००=११००/- |
| ४ | **परदेशी विद्यार्थी**<br>योग्यताप्रमाणपत्राचे विलंब शुल्क परदेशी विद्यार्थी (दि.१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत ) | रु.७००+१०० = ८००/- | रु.१५००+१००=१६००/- |
| ५ | **भारतीय विद्यार्थी**<br>योग्यताप्रमाणपत्राचे अतिविलंबशुल्क भारतीय विद्यार्थी दिनांक १ डिसेंबर पासून पुढे | रु.५००+१००<br>+प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु. २०/- | रु.१०००+१००/-<br>+प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु. २०/- |
| ६ | **परदेशी विद्यार्थी**<br>योग्यता प्रमाणपत्राचे अतिविलंब शुल्क परदेशी विद्यार्थी १ डिसेंबर पासून पुढे | रु. ७०० +१००<br>+प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु. २०/- | रु.१५००+१००<br>+प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु. २० /- |
| ७ | **(भारतीय /परदेशी विद्यार्थी)**<br>योग्यता प्रमाणपत्र अर्ज विलंबाने विभागीय मंडळाससादर केल्यास कनिष्ठ महाविद्यालयाकडून घ्यावयाची विलंब शुल्क | प्रति विद्यार्थी<br>रु. १०००/- | प्रति विद्यार्थी<br>रु. १०००/- |
| ८ | **(भारतीय /परदेशी विद्यार्थी)**<br>योग्यता प्रमाणपत्र अर्ज सादर न करता इ. १२ वीत आवेदन पत्र भरल्यास कनिष्ठ महाविद्यालयाकडून घ्यावयाची दंडात्मक रक्कम | प्रति विद्यार्थी<br>रु. १०००/- | प्रति विद्यार्थी<br>रु. १०००/- |
| ९ | कागदपत्रांची पूर्तता प्रतिदिन प्रति विद्यार्थी | रु. २०/- | रु. २०/- |
| १० | कनिष्ठ महाविद्यालयांकडून घ्यावयाची प्रति विद्यार्थीशुल्क | रु. १००/- | रु. १००/- |

## INSTRUCTION TO THE CANDIDATE APPLYING FOR THE ELIGIBILITY CERTIFICATE

1) Students who have passed 10 years School Certificate Examination (under 10+2 Education Pattern) of any statutory Board in India, shall be admitted to the First Year of a Junior College, if they have offered and passed in five subjects, with English as one of the subject (As per Board Regulations-1977 Rule No.79 (1)

2) Following Documents are required, to issue the Eligibility Certificate.
   i) Application Form for Eligibility Certificate prescribed by the Divisional Board.
   ii) Mark-list (Std. 10th for admission in Std. XIth and Std. 10th & 11th for admission in Std. XIIth
   iii) Passing Certificate (Std. 10th/Provisional Passing Certificate for admission in Std. XIth/XIIth)
   iv) School Leaving Certificate/Transfer Certificate/Transcript with counter Signature thereon by appropriate Education Authority in the relevant cases.
   v) Migration Certificate in Original
   vi) Appendix 'A' (for Foreign Student) shown on Eligibility Certificate Form
   vii) Undertaking shown on Eligibility Certificate Form
   viii) Report of Verification of Mark-list/Certificate (Std. Xth and XIIth for Pvt. Students.) Give details (page No.2) last Exam (Std. Xth) Seat No., Total Marks. Percentage, Grade & Year of passing.

(Please enclose original documents of Sr. No. i, v, vi, vii and attested Xerox copies of Sr. No. ii, iii, iv & viii)

   a) Students should communicate the change in college if any to the Divisional Secretary, Pune Divisional Board, Pune before the Eligibility certificate is issued to them.

3) Fee for Eligibility Certificate (Std. 11th/Std. 12th)
   i) Students coming from other Board/State in India, per candidate Rs.500/-
   ii) Students coming from outside India per Candidate Rs.700/-

4) .The dates for submission of the Eligibility Certificate form to the Board office through the Jr. College

| | | |
|---|---|---|
| i) | With Regular fee (Per candidate of Rs.700/-) | 16th August to 15th Sept. |
| ii) | With Late fee (Per candidate of Rs. 100/-) | 16th September to 15th November (Rs.700+100=800) (Students coming from outside India) |
| iii) | With Late fee+(Per Candidate Per day of Rs.20/-) | From 16th November onwards |
| iv) | With Late fee (Per candidate of Rs.100/-) | 16th September to 15th November (Rs.500+100=600) (Students coming from inside India) |

5) Date and late fee charges for the submission of remaining documents for Eligibility Certificate.

| | | |
|---|---|---|
| i) | Last date of submission of required remaining documents | up to 20th January |
| ii) | With late fee Rs.20/- per day per candidate | From 21st January |
| iii) | With late fee Rs. 100/- per candidate for college | |

*******

## APPENDIX 'A' (For Foreign Student only)

(TO BE FILLED IN BY THE HEAD OF THE INSTITUTION LAST ATTENDED BY THE FOREIGN CANDIDATE)

This is to certify that
Shri./Smt. ..........................................................................................

(Name of the Student)

has passed the ........................................... Examination held by ......................... (The Institution/Department of Education/University/Council as the case may be) in the year ............... of college. The duration of the above course is ........................... year of Schooling and .............. year of college. The last public examination passed by the student is ...................................... held by ............................... in the year ..................

Address : ......................................
..................................................
..................................................

Signature : .............................

Designation: ............................

Place : ........................................
Date : .........................................

---

**(TO BE FILLED IN BY THE AUTHORITIES OF EMBASSY/HIGH COMMISSION OF INDIA IN THE COUNTRY FROM WHICH THE STUDENT COMES)**

The Divisional Secretary
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education.
Pune Divisional Board Pune - 411005.

Address : ......................................
..................................................
..................................................

Signature : .............................

Designation: ............................

Place : ........................................
Date : .........................................

· Please use CAPITAL LETTERS
· Applicable to the foreign students only.

ऑनलाईन शुल्क भरताना ठराविक विद्यार्थ्यांना सिलेक्ट करुन शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**५) यापूर्वी कनिष्ठ महाविद्यालयाकडून ऑफलाईन योग्यता प्रमाणपत्राचे नोंदणी अर्ज व इतर कागदपत्रांच्या हार्ड कॉपीज (Hard Copies) विभागीय मंडळाकडे जमा करण्यात येत होत्या तथापि फेब्रु- मार्च २०२५ च्या परीक्षेपासून सदर कार्यपद्धतीत बदल करण्यात आला असून कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज व इतर कागदपत्रे प्रत्यक्षात जमा न करता ती कागदपत्रे ऑनलाईन (Online) पद्धतीने विभागीय मंडळाकडे सादर करावयाची आहेत.** अर्ज विभागीय मंडळाकडे सादर करण्यापूर्वी सदर अर्जातील माहिती तसेच अपलोड केलेले कागदपत्रे हे योग्य असल्याची खात्री कनिष्ठ महाविद्यालयांनी करावयाची आहे. तसेच परिपूर्ण प्रस्ताव असणा–या विद्यार्थ्यांचेच अर्ज विभागीय मंडळाकडे पाठविण्यात यावे.

**६)योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच भरावयाचा आहे. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**७)योग्यता प्रमाणपत्राची Link व अतिरिक्त शुल्काचा तक्ता मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व कनिष्ठ महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून दयावी.**

**८) फेब्रु-मार्च २०२५** च्या परीक्षेपासून प्रथमतः योग्यता प्रमाणपत्र अर्ज व त्यासंदर्भातील कार्यपद्धती ही ऑनलाईन (Online) पद्धतीने नव्याने सुरु करण्यात येत आहे. त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी दि.२६ ऑगस्ट, २०२४ पासूनच करण्यात यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, -४.

सोबतः–1."Appedix A"

2. परिशिष्ट ब

3. दि. २३/०८/२०२४ रोजीचे परिपत्रक